# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिन २६.०५.२०२२ (गुरूवार)

---

## पोस्टे पारशिवनी हद्दीतील अवैध देशी दारू विक्री करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक २५.०३.२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक रामटेक उपविभाग अंतर्गत अवैध धंदयावर आळा घालणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदारा कडुन माहिती मिळाली की पोस्टे पारशिवनी हद्दीतील तामसवाडी शेत शिवारातील पप्पी अरोरा यांचे विट भट्टयाजवळ एक इसम पांढऱ्या रंगाची मोपेड वर अवैधरित्या देशी दारु ची विक्री करीत आहे. अश्या विश्वसनीय खबर प्राप्त झाल्याणे आम्ही स्टॉप सोबत पारशिवनी शेत शिवारात सापळा रचुन रेड कार्यवाही केली असता सदर इसम नामे नागसेन गुरूदेव चव्हान हा आपले मोपड क्र. एमएच ४० सीजे ८८७४ च्या डिक्कीत व पायदानासमोर एका प्लॅस्टीक थैलीमध्ये देशी दारू अवैधरित्या विनापरवाना बाळगुन विक्री करीतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन **देशी दारू १८० एमएल च्या ४४ निपा कि. ४,४००/— रू. व मोपड क्र. एमएच ४० सीजे ८८७४ कि. ५०,०००/— रू. सह एकुण ५४,४००/— रू. चा माल जप्त करण्यात आला. आरोपी नागसेन गुरूदेव चव्हान वय ४३, रा. तामसवाडी** याचे विरूध्द पोस्टे पारशिवनी येथे महा.दारूबंदी कायदयान्वये गुन्हा नोंद करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे पारशिवनी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोलीस नाईक रोहण डाखोरे, अमोल वाघ, अमोल कुथे यांचे पथकाने पार पाडली.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडलेला आहे.)**

## ॲल्युमिनियम तार चोरी

पोस्टे एमआयडीसी बोरी :— अंतर्गत सालईधाबा शिवार ३ कि.मी उत्तर. दिनांक २५/५/२२ चे १६:३० वा पुर्वी, सालईधाबा शिवारात डीटीसी बॉक्स कॉपरच्या पट्ट्या ०३ नग किमंती अंदाजे २,०००/— रू व ०३ इलेक्ट्रीक एलटी पोल वरील ॲल्युमिनियम तार अदांजे ४०० मीटर किमंती ८,००० रू असा एकुण १०,०००/— रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मुकेश दिलीप माडवे वय ३० वर्ष रा. भारकस ता. हिगंणा जि. नागपूर यांचे रिपोर्टवरून पोस्टे एम आय डीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पो हवा शैलेन्द्र नागरे हे करीत आहे.

## लैंगीक अत्याचार

पोस्टे नरखेड_ :– अंतर्गत मौजा मोवाड वार्ड क्र १, येथे दिनांक २५/०५/२२ चे ११/०० वा. दरम्यान, यातील फिर्यादी ही घरी हजर नसतांना, शेजारी राहनारा आरोपी नामे –पोतन चुरे हा फिर्यादीचे घरी आला व फिर्यादीचे मुलगी वय ७ वर्ष हीला पोळ्या टाकण्याचा बहाण्याने स्वताचे घरी ओढत घेवुन, जावुन आतुन दार टेकवुन जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला व ही गोष्ट कोणाला सांगितले, तर मारून टाकीन, अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून आरोपी नामे– पोतन चुरे वय अंदाजे ५२ वर्ष रा मोवाड यांचे विरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ३७६(ए)(बी),३४२,४५१,५०६, भादवी सह कलम ४,६ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास महीला पोलीस उपनिरीक्षक सारिका गुरूकर पोस्टे नरखेड मो .९६६५८३४९९९ हे करीत आहे

## पळवुन नेणे

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत मौजा महार खैरी १२ किमी उत्तर. येथे दिनांक २५/५/२२ चे ११.०० ते १४.०० वा दरम्यान, यातील फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष हिला कोनीतरी अज्ञात आरोपी ने फिर्यादी यांचे कायदेशिर रखवालीतुन फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३६३ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनीरीक्षक देवेन्द्र सोनावले पोस्टे कोंढाळी मो नं. ९५३४३५७१३६ हे करीत आहे.

## प्राणांकित अपघात

१.पोलीस स्टेशन उमरेड :– अंतर्गत उमरेड नागपूर हायवे रोड व्दारका सिटी गेट समोर उमरेड २ कि,मी ,पश्चिम येथे दिनांक २५/०५/२२ चे १३/३५ ते १३/४० वा, यातील यातील होंडा सिटी कार क्र, एम एच, ४० सीए१२०० चा चालक याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून व्दारका सिटी उमरेड कडून येणा–या मोटार सायकल एमएच४० सीई ०५६१ ला समोरून धडक दिल्याने **मोटार सायकल चालक नामे –अनिल इस्तारी वरठी वय ३५ वर्ष रा, बारवा ता, उमरेड हा गंभीर जख्मी झाला. त्यास ग्रा.रू उमरेड येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – मोहम्मद हाफीज अब्दुल गणी शेख वय ३८ वर्ष रा, चिकन मार्केट ईतवारी पेठ उमरेड यांचे रिपोर्टवरून पो स्टे उमरेड येथे कलम २७९,३०४(अ)भादवी, सह कलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत खोब्रागडे सर, मो,न, ८८८८८१७१८३ करीत आहेत.

**२.पोलीस स्टेशन सावनेर :–** अंतर्गत मौजा जयस्वाल लॉन जवळ पटेल गॅरेज समोर २ किमी पुर्व, येथे दिनांक २५/५/२२ चे १८/१५ वा यातील फिर्यादीचा मुलगा मृतक नामे मीनल कोलते हा आपली बजाज मो. सा. क्र.एम. एच. ४० बी. वी. ३८९५ ने नागपूर रोड कडे जात असता पटेल गॅरेज समोर एका अज्ञाात पिकअप चारचाकी वाहनाने आपले वााहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून मृतक मिनल कोलते यास जबर धडक दिल्याने मृतक उपचारादरम्यान मरण पावला

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – धनलाल लक्ष्मन कोलते वय ५७ रा. वार्ड नं. १४ चिचपूरा सावनेर यांचे रिपोर्टवरून पो स्टे सावनेर येथे आरोपीविरूध्द कलम २७९,३०४(अ) भादवी सहकलम १८४,१३४,(अ),(ब) मो.वा.का अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस पोलीस निरीक्षक मारूति मूळूक पो. स्टे. सावनेर करीत आहेत

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**